# प्रकरण - २ रे

# दलित स्त्रियांची आत्मकथने आणि 'आयदान'

## प्रस्तावना :-

१) दलित स्त्री आत्मकथनांचे स्वरुप

२) शोषित व उपेक्षित स्त्रियांच्या कथा

३) खंबीर स्त्री मनाची गाथा 'माज्या जल्माची चित्तरकथा'

४) चिंतनशील मनाचा 'अंत:स्फोट'

५) दलित स्त्री जीवनाचे चित्र 'जिणं आमुचं'

६) एका समाजसेविकेची कहाणी 'मिटलेली कवाडे '

७) दलित स्त्री जीवनाची कहाणी ' रात्रं दिन आम्हा'

८) एका भटक्या स्त्री जीवनाची गाथा 'मरणकळा'

९) भटक्या समाजाचे संघर्षमय जीवन चित्र 'तिन दगडाची चूल '

१०) आदिवासी जीवनाचे दु:ख मांडणारे आत्मकथन 'आदोर'

११) पुरुषी व्यवस्थेला छेद देणारं आत्मकथन ' मला उध्वस्त व्हायचयं'

१२) दलित स्त्रियांची आत्मकथने व 'आयदान'

१३) दलित स्त्रियांच्या आत्मकथनातील स्त्री जीवन दर्शन

१४) सारांश

१५) निष्कर्ष

१६) संदर्भ ग्रंथसूची

**प्रस्तावना :-**

स्त्री आणि व्यथा वेदना यांचे समीकरण प्राचीन काळापासून आहे. नव-निर्मितीची सोय निसर्गाने तिच्यामध्ये केली आहे. या शारीरिक वेदनेबरोबर अनेक सामाजिक, आर्थिक, मानसिक, कौटुंबिक, भावनिक व्यथा-वेदना तिला भोगाव्या लागतात. कधी प्रियकराकडून, तर कधी नवऱ्याकडून, कधी नातेवाईकांकडून, तर कधी समाजाकडून तिची फसवणूक झालेली दिसते.त्यात दलितातील स्त्री ही दलितांहून ही दलित आहे. उच्चवर्णीय स्त्रियांना कर्मकांड, सोवळे-ओवळे सासूरवास यांचा त्रास खूप तर दलितस्त्रिला या सगळ्या बरोबरच दारिद्रय, उपासमार, कष्ट,अस्थिरता, गरीबी, अन्याय-अत्याचार याचा त्रास अधिक झालेला आहे.

या सगळ्यावर उपाय म्हणून स्त्री शिक्षणाचे कार्य स्वातंत्र्यपूर्वकाळात सुरु झाले होते. महात्मा जोतिराव फुल्यांनी स्त्रियांसाठी व दलितांसाठी शिक्षणाचे हाती घेतलेले कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जोमाने ते पुढ नेले. शोषण आणि असमानता यांच्या विरुध्द लढण्याचे महत्त्वपूर्ण शस्त्र म्हणजे शिक्षण, असे विचार मांडणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी स्त्री शिक्षणावरही भर दिला आहे. पिपल्स एज्युकेशन, सोसायटी, सिध्दार्थ कॉलेज, मिलिंद कॉलेज, महाडचे कॉलेज वगैरे सुमारे २८ संस्थामधून त्यांनी शिक्षण कार्य विस्तारीत केले. त्यांच्या संस्थातून शिक्षित झालेल्या दलितस्त्रियांनी दलित स्त्रीयांच्या शिक्षण कार्यासाठी स्वत:ला वाहुन घेतले आहे.

दलित स्त्री ही दलितांहुन दलित असून तिचे शोषण सर्व बाजुंनी होते. तिला मानवी हक्क लाभले पाहिजेत. म.फुले यांचे स्त्रीमुक्तीचे हे विचार अत्यंत मूलभूत आहेत डॉ. आंबेडकरांनी कायद्यांच्या माध्यमातून स्त्रिला बंधनमुक्त करण्यासाठी परिस्थिती

निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कार्यामुळे आणि त्यामागील वैचारिकतेमुळे आज आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा संचार व्हायला अनुकुल परिस्थिती निर्माण होत गेली आहे. भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या महत्वाच्या योगदानामुळे आजची स्त्री शिक्षणांची लक्षणीय प्रगती आपल्याला दिसते.

दलित स्त्री लेखिकांची आत्मकथने एका वेगळ्याच अनुभव विश्वात वाचकांना घेऊन जातात. त्यातून समाज, संस्कृती आणि धर्मव्यवस्थेचा एक वेगळाच कालपट उभा राहतो. स्त्री-आत्मकथने ही निव्वळ पतिचरित्र नसतात तर तो एक समाज, संस्कृती आणि धर्म यांच्या संस्काराचा मानसिक प्रवास असतो. हे लक्षात घ्यायला हवे. स्मृतिचित्रे, अंतस्फोट, जेव्हा माणुस जागा होतो, माज्या जल्माची चित्तरकथा, यांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. हे मत चिंतनीय असेच आहे. ''अलिकडच्या काळात धीटपणे प्राजंळ आत्मकथने मराठी वाड्.मयात निर्माण झाली आहेत. स्त्रीकडे भोगदासी म्हणून पाहणाऱ्या मानवी विकृतीचे इतके भेदक चित्र आज अन्यत्र नाही. 'सांगते ऐका' मध्ये हंसा वाडकरांनी पुरुषी अहंकाराचा मुखवटा फाडुन टाकला आहे. स्त्रीच्या वाट्याला आलेल दु:ख नव्हे. लादलेले दु:ख किती भीषण व असु शकते आणि या दु:खामुळे स्त्री -मनाची होणारी तडफड किती जीवघेणी असु शकते यांचे विदारक चित्र म्हणजे हंसाबाईचे आत्मकथन.'' [१] हे मत मनास पटते. कारण प्रा. नलगे व डॉ. पानतावणे यांचे हे मत स्त्रीमनाचे नेमके वर्णन करते.

## १. दलित स्त्री आत्मकथनाचे स्वरुप

दलित स्त्री-आत्मकथनांनी तर एकूण स्त्री-आत्मकथनाला एक नवाच आशय दिला आहे.ही आत्मकथने मनोरंजनासाठी किंवा आठवणींचा रम्य चाळा करण्यासाठी

जन्मली नाहीत. तर जीवनाचे,विषम समाज स्थितीचे दाहक प्रतिपादण्यासाठी ही आत्मकथने उदयाला आली म्हणूनच त्यातून संपूर्ण आत्मकथनभर स्त्री जाणीव चित्रीत होते. ''अनुभवांच्या वेगळेपणामुळे या आत्मकथनांना सजीवत्व प्राप्त झालेले आहे. आत्मसमर्थनाच्या आहारी न जाता आणि कुणाच्या सहानुभुतीसाठी हात न पसरता ही आत्मकथने उभी आहेत. दलित लेखिकांची स्त्री म्हणून दु:खे आहेतच पण त्यापेक्षाही दलित स्त्री म्हणून तिच्या वाट्याला आलेले जन्म दु:ख शब्दातीत आहे. कोणत्याही दैववादाने किंवा नियतीमुळे तिचे सामाजिक दु:ख जन्मले नाही, तर अनिती आणि वर्चस्वखोर उद्दाम संस्कृतीने तिला अप्रतिष्ठित राखले.यांचा शिलालेख म्हणजे दलित स्त्री-आत्मकथने दलित कुटुंबसंस्था दलित स्त्री-पुरुष यातील द्वंद्व, रुढी दास्य, पुराण मानसिकता यातुन नव्या मानसिकतेची शोधयात्रा या आत्मकथनातुन विदारकपणे मांडली आहे. 'माज्या जल्माची चित्तरकथा ' (शांताबाई कांबळे), 'जिणं आमुचं'(बेबी कांबळे), किती दाहक आहे याचा 'अंत:स्फोट' (कुमुद पावडे) या दलित स्त्री आत्मकथनाच्या रुपाने झाला. एका परीने 'मिटलेली कवाडे' मुक्ता सर्वगोडे यांनी सताड उघडली. मराठी स्त्री आत्मकथनाला आपल्या समृद्ध अनुभवांनी योगदान देणारी ही आत्मकथने ठरावीत. आपण जे जीवन जगलो ते अत्यंत निर्भीडपणे व मुक्त पणे व्यक्त करणारी दलित स्त्री आत्मकथने म्हणजे मराठी आत्मकथनाला गवसलेली एकनवी दिशाच होय.'' (२) वरील प्रा. नलगे व डॉ. पानतावणे यांचे विवेचन लक्षात घेता असे वाटते की, दलित स्त्री आत्मकथने ही दलित स्त्री जीवनाचे पदर उलघडण्याचे काम करतात. व्यक्तीत्वाचे विविध रंग ल्यालेली ही आत्मकथने म्हणजे मराठी स्त्रीचा सांस्कृतिक इतिहासच होय कारण स्त्रीची अनेक वर्षांची जडण घडण येथे दिसते. ''दलित स्त्रीयांच्या आत्मकथनांचे स्वरुप वैविध्यपूर्ण आहे. यातील समाजजीवन

दारिद्रयाने पिचलेले आणि गरीबीने विकलांग झालेले आहे. अस्पृश्यतेमुळे दलितांना पशूपातळीवरील जीवन जगावे लागले. मानवी हक्काची पायमल्ली आणि कुत्तर ओढ दलितांच्या वाट्याला आली. भारतीय समाज व्यवस्थेच्या संदर्भातील येथील अस्पृश्यांचे जीवन अतिशय ओंगळवाणे आणि घृणास्पद ठरले आहे. उच्चवर्णियांनी जातिव्यवस्थेला प्रमाण माणून आपले सामाजिक वर्तन नियंत्रित केलेले दिसते. चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील शेवटचा शुद्र माणूस इथे नागवला गेला. त्याची मानहानी झाली. त्याचा विटाळ मानला गेला. अस्पृश्यातील जाती अंतर्गत परंपरानीही तो जखडला गेला. जात पंचायतीने हैराण झाला. त्याचे चित्रण या आत्मकथनात दिसते.'' (३) हे डॉ. मनोहर जाधव यांचे निरीक्षण यथोचित असे आहे. कारण इथली मनुप्रणित चातुवर्ण्य व्यवस्था स्त्री- शुद्रांच्या शोषणाचे कडक नियम घालून देते. पण त्याही पुढे जाऊन दलित स्त्रियांना गुलामाहूनही गुलाम वागवण्याची वाईट शिकवण देते. सर्व बाजुंनी छळल्या जाणाऱ्या या स्त्रीला महात्मा फुले व सावित्रीबाई फुले सारख्या समाज सेवकांनी स्वातंत्र्य मिळवून देण्याचे प्रयत्न केले. परंतु ही व्यवस्था पुन्हा एकदा त्यांना गुलाम करण्यासाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या योजित असते.

## २. शोषित व उपेक्षित स्त्रियांच्या व्यथा -

दलित स्त्री आत्मकथनातील अनुभवविश्व दलित पुरूषांपेक्षा वेगळ आहे. दलित स्त्री दलित तर आहेच पण दलितांमधील स्त्री असल्याने दुहेरी शोषण, दु:ख तिच्या वाट्याला आले. अत्यंत दाहक अनुभवाचे आविष्करण करणाऱ्या दलित स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथनांमध्ये बेबी कांबळे यांचे 'जिणं आमुचं' कुमुद पावडे यांचे 'अंत:स्फोट', मुक्ता सर्वगोड यांचे 'मिटलेली कवाडे', शांताबाई दाणी यांचे 'रात्रंदिन आम्हा', शांताबाई कांबळे यांचे 'माज्या जल्माची चित्तरकथा', जनाबाई

गिऱ्हे यांचे 'मरणकळा', विमल मोरे यांचे 'तिन दगडाची चुल', उर्मिला पवार यांचे 'आयदान' इ. आत्मकथनांचा समावेश आहे.

समाज कोणताही असो, सर्वाधिक शोषण त्या त्या समाजासह सर्वांनीच स्त्रियांचे केलेले आहे. प्रस्थापित समाज व्यवस्थेने स्त्रियांवरील अन्याय व अत्याचाराच्या बाबतीत कोणती ही सीमा बाळगली नाही. या साऱ्यांचा अतिरेक झाला. दलितांच्यावर शुद्र म्हणून जसे अन्याय केले. याच पध्दतीने दलित स्त्रियांवरही अन्याय केले. याचे चित्रण दलित आत्मकथनांमधून आले आहे. या आत्मकथनांच्या-मधून सतत राबणारी आपल्या कुटुंबासाठी कष्ट उपसणारी आपल्या संसाराची चिंता करणारी शोषिकमनाची नवऱ्यापेक्षा अधिक श्रम करणारी स्त्री अभिव्यक्त होते. आणि हे स्त्रियांचे चित्रण यथार्थ आहे. दलितांचे जीवन दु:खाचे कष्टाचे यातनांचे असते. यातही दलित स्त्रियांचे जीवन अधिकतम यातनांचे बनते. मुके-पणाने सारे सहन करीत ती जीवनाला सामोरे जाते . याचे चित्रण दलित आत्म-कथनांमधुन यथार्थपणे आविष्कृत होते. ही स्त्रियांची यथार्थ चित्रणे म्हणजे स्त्रियांच्या जीवनाची भोगकथाच असते.

दलित, शोषित,भटक्या आदिवासी समाजातील पुरुषांना या व्यवस्थेने यातनामय जीवन दिल्याची अनुभूती वास्तवरुपात प्रकट झाली आहे. तर याच जाती-जमातीमधील जीवनाची अनुभूती आपल्या याहीपेक्षा अधिक यातनांनी, वेदनांनी भरलेले आहे.

" दलित स्त्रीचे जीवन हे असे कष्टाचे, मनाचा आणि शरीराचा कोंडमारा करणारे असते. तेव्हा साहजिकच असा प्रश्न पडतो की, या अशा जीवनाला तोंड

देण्याची इच्छाशक्ती, सामर्थ्य आणि ताकद आणते तरी कुठुन? सर्वसामान्यमाणसाला जी शाबासकीची गरज असते ती तिची कधीच पुरी होत नाही. मग तिची कोणी काळजी घेणे, प्रेम किंवा आदर दाखविणे, तर दु:ख जीवनातले भौतिक यश तर तिच्यापासून नेहमी लांब असते. या अशा आयुष्याचे कुठल्या शब्दात वर्णन करावे? न टाळता येणारी कर्तव्याची मालिका असे त्याला म्हणावे? तिच्या आयुष्याचे दु:ख कमी करणाऱ्या कांही गोष्टी आहेत का ? निरपेक्ष कष्टाच्या या आयुष्याला कांही भरपाई आहे का ? ." [४] अशा पध्दतीचे विविध प्रश्न दलित स्त्रिला जगताना पावलो पावली पडलेले आपल्याला दिसून येतात. निरपेक्ष व निस्वार्थी असणाऱ्या स्त्रीचे शोषण कसे करावे हेच इथली समाज व्यवस्था शिकवताना आपल्याला दिसून येते. त्यामुळे अन्यायाने पोखरलेल्या स्त्रिचे नेमके चित्रण प्रामुख्याने दलित आत्मकथनांचा विषय झालेला आपल्याला दिसून येतो. त्यामुळे दलित स्त्री आत्मकथन वाचत असताना मनुप्रणित वर्णव्यवस्था व पुरुषसत्ताक कुटुंब व्यवस्था यात चिरडलेल्या दु:खी स्त्री जीवनाची जाणीव वाचकाला होते.

## ३. खंबीर स्त्री मनाची गाथा - 'माज्या जल्माची चित्तरकथा'

एक दलित स्त्री सातवीपर्यत शिक्षण घेते. लग्न झाल्यावर आणि गरोदर असताना नवरा दुसरी बायको करण्याचा निश्चय करतो. तेव्हा ती त्याला ठणकावून सांगते " आता मी काय येत नाय, तिला घेऊन जावा अन् खुशाल राज्य करा. आता माजी आशा सोडाच." [५] आणि ती जिद्दीने तिथेच रहाते. स्वावलंबी होण्यासाठी दिवस गेलेल्या व अवघडलेल्या अवस्थेत ही दुरची खेडेगावातील शिक्षिकेची नोकरी

स्वीकारते. मध्यंतरी नवऱ्याची दुसरी बायको मेल्यावर समेट करुन यशस्वीपणे संसार करते. प्रदीर्घ काळ नोकरी केल्यानंतर शिक्षण विस्तार अधिकारी म्हणुन सन्मानाने सेवानिवृत्त होते. दरम्यान सासर व माहेर जपत स्वत:च्या मुलांना आणि एका मुलीला पदव्युत्तर शिक्षण देते. मोठे करते. एवढा आलेख 'माज्या जल्माची चित्तरकथा' शांताबाई कृष्णाजी कांबळे' यांच्या आत्मकथनात रेखाटली आहे.

परंतु केवळ कर्तृत्वाशाली आयुष्य वाचकांसमोर मांडणे हा दलित आत्मकथनाचा हेतू नसतो. अर्थात येथे ही लेखिकेचा असा हेतू नाही. तर या निमित्ताने आपला समाज आणि या समाजातील दारिद्रय, दु:ख, समज-अपसमज, श्रध्दा-अंधश्रध्दा आणि काळाच्या ओघात आलेले परिवर्तन यांचा मागोवा घेतलेला दिसतो. आंबेडकरी चळवळ त्यांच्या प्रेरणेने झालेल धर्मांतर, शिक्षणामुळे बदललेली पिढी आणि दारिद्रयामुळे, परिस्थितीमुळे न शिकु शकलेली पिढी यांचे नुसते दर्शन घडते असे नव्हे तर या दोन पिढ्यांमध्ये पडलेले आर्थिक, सामाजिक, मानसिक अंतर ही लेखिका दाखवू इच्छिते. कारण लेखिका केवळ स्वत:च्या सुखदु:खात रममाण होणारी, त्यालाच कवटाळीत, गोंजारीत बसणारी नाही. स्वत:च्या उन्नयना बरोबरच आपल्या गरीब अज्ञानी समाजाचे ही उन्नत व्हावे. त्यांचा उत्कर्ष व्हावा. पिढ्यान-पिढ्या सामाजिक गुलामगिरीत आणि दु:खाच्या खाईत खितपत पडलेल्या समाजाला न्याय मिळावा. यासाठी हे लेखन केले आहे.

## ४. चिंतनशिल मनाचा 'अंत:स्फोट' -

'अंत:स्फोट' हा कुमुद पावडे यांचा आत्मकथनात्मक लेख संग्रह आहे. या पुस्तकाच्या चिंतनशील भूमिकेतून समाजविषयक व जीवनविषय दृष्टिकोन जाणवतो. या आत्मकथनात्मक लेखसंग्रहात एकूण नऊ लेख समाविष्ट केलेले आहेत. आणि

त्यांना वेगवेगळी शीर्षके दिलेली आहेत. त्यात विचार संगती बरोबरच कालसंगती ही आहे. यातून यापूर्वी म्हटल्याप्रमाणे लेखिकेच्या जीवनासंबंधीही काही प्रमाणात का होईना माहिती मिळते. या संग्रहातील पहिला लेख या पुस्तकाची भूमिका स्पष्ट करतो. सावित्रीव्रताची आख्यायिका आणि ते करण्याची रुढ परंपरा कशी चुकीची, भ्रामक व फोल आहे. हे या लेखातील माय बाईच्या निमित्ताने साधार पटवून देण्याचा लेखिकेचा प्रयत्न आहे.

"चळवळीत काम करताना लेखिकेला जाणवणारे सत्य ती येथे नोंदविते. आपल्या समाजातील विद्यार्थी तरुण वर्ग हा सिनेस्टाईलने जगू पाहतो. कामगारांना आपल्या खऱ्या हक्काची जाणीव नाही. तो पोटाच्या सुखासाठी कुणी सांगितले तसे ऐकतो. दलित साहित्यिक ही आत्मगौरव आणि एकमेकांची उणीदुणी काढण्यात मग्न असतात. एकूणच समाजात योग्य जाणिवा निर्माण केल्या जात नाहीत. हे समाजाचे चित्र काही बरे नाही. कृत्रीमता, खोटा बडेजाव आपसातील हेवेदावे वर्ग विसरुन तळातल्या स्त्रियांचे प्रश्न सोडविणे महत्वाचे असल्याचे कुमुद पावडे यांना वाटते."[(६)]

कुमुद पावडे यांच्या या सर्व लेखांमधून लेखिका आपल्या जीवनातले छोटे छोटे व साधे साधे प्रसंग चित्रित करते. हे प्रसंग कधी तिच्या स्वत:शी संबंधित आहेत. तर कधी तिच्या सहवासात आलेल्या व्यक्तिशी संबंधित आहेत. मात्र या माध्यमातून ती स्वत:चा दृष्टीकोन आणि जीवनविषयक तत्वज्ञान सहज सांगुन जाते. निवेदनातील सहजता ही सुध्दा लक्षणीय आहे. प्रसंग चित्रणामुळे विषयाचे प्रतिपादन प्रभावी आणि सुलभ झालेले आहे.

## ५. दलित स्त्री जीवनाच चित्र 'जिणं आमुचं' -

' जिणं आमुचं' हे बेबी कांबळे यांचे आत्मकथन असले तरी यातुन त्यांच्या वैयक्तिक जीवनावर प्रकाश टाकण्याबरोबरच त्यांच्या समाजाविषयी वाचकाला अधिक माहिती मिळते. याचे कारण असे की, लेखिकेला स्वत:च्या व्यक्तीगत जीवना विषयी फारसे सांगणे महत्वाचे वाटत नाही. तर आपण जगलेल्या आयुष्याच्या निमित्ताने आपल्या समाजाचे सर्वांगिण चित्र रेखाटण्यात त्यांना अधिक स्वारस्य आहे आणि म्हणूनच त्यांच्या जन्मापासून ते या आत्मकथन लेखनकाळातील त्यांचा समाज आणि त्या समाजात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उदयानंतर आलेली परिवर्तने, त्यांचा परिणाम डॉ. आंबेडकराच्या पश्चातचा समाज यांचेही चित्र या आत्मकथनात उमटलेले दिसते.

बेबी कांबळे यांच निरीक्षण अत्यंत सुक्ष्म आहे. म्हणून त्यांच्या लेखनात त्यांच्या समाजाविषयीचे अनेक बारीक सारीक तपशील येतात. महारवाड्यातील नित्याच्या व्यवहारातील शब्द, शिव्या, म्हणी, गाणी इ.आत्मकथनात येतात.

' जिणं आमुचं' ला जोडलेल्या प्रस्तावनेत डॉ. मॅक्झीन बर्नसन म्हणतात, ''लहानापासून समाज जीवनाचे निरीक्षण बारकाईने करण्याचा नाद त्यांना होता. आणि अजूनही आहे. त्यांनी अनेक वर्षे केलेले स्वत:च्या समाजाचे डोळस आणि सहानुभूतिपूर्वक निरीक्षण या पुस्तकात लिहून ठेवल्यामुळे 'जिणं आमुचं' समाज शास्त्रज्ञ आणि इतिहासकारांच्या दृष्टीने एक अनमोल खाण ठरेल. असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.'' [७] डॉ. बर्नसन यांच्या या अभिप्रायाशी कोणत्याही सुजाण वाचकाला सहमत होणेच आवडेल कारण त्यांनी स्वत:च्या समाजातील व आवतीभवतींच्या जगातील फरक याच निरीक्षण करुन डोळस व तटस्थपणाची वृत्ती ठेवून 'जीणं आमुचं' मधील अनुभवाची चित्रणे केली आहेत.

## ६. एका समाज सेवीकेची कहाणी -'मिटलेली कवाडे'

दलित समाजाच्या परिवर्तनाची, समृद्धीची आणि लोकशाहीची ' मिटलेली कवाडे' उघण्याच्या हेतुनेच मुक्ता सर्वगोड यांनी समाज सेवेचे व्रत घेतले. आणि ग्रामीण व शहरी जीवनात जमेल तसे कार्य केले. केवळ हौस म्हणून हे कार्य करत असताना आपल्याच समाजातील स्वार्थाच्या चिखलात रुतलेल्या पुढाऱ्यांनीही काँग्रेसची बाई आहे, वरच्या समाजातील बाई आहे, असा धोबी शिक्का मारुन त्यांच्या समाजकार्यात विघ्ने आणण्याचा कसा प्रयत्न केला आहे. हे सर्व मुक्ताबाईंनी प्रांजळपणे मांड लेले आहे. सामाजिक कार्य करत असताना त्यांना आलेले कडू-गोड अनुभव त्यांनी प्रस्तुत आत्मकथनामध्ये मांडलेले आहेत.

''मुक्ता सर्वगोड यांनी खेड्यातील दलित स्त्रियांवर होणारा अत्याचार उघड करुन त्यांच्या दु:खांना वाचा फोडली आहे. बदलत्या राजकीय समीकरणामुळे दलित समाज अन्यायाचा वाटेकरी होतो, याचेही चित्रण मुक्ताबाई करतात. समाज जीवना तील विविध विद्रुप अंगे चित्रित करताना मुक्ताबाईंनी संयम पाळलेला दिसतो.'' (८)

कित्येक हजार वर्षापासून सवर्णांनी अस्पृश्य वर्गाच्या न्याय हक्काची पायमल्ली करुन त्याचे जीवनच एका दु:खाच्या डोहात ढकलून दिले होते. त्यांना पशुतुल्य माणून अगदी हीन स्वरूपाची वागणूक दिली गेली. त्यांना स्वत: पासूनच नव्हे तर त्यांच्या मानवी जीवनापासून दुर ठेवले होते. अशा या दलित समाजाची ज्ञान, सुख, समृध्दी यांची 'मिटलेली कवाडे' उघडण्याचा प्रयत्न म. फुले, डॉ. आंबेडकर यांनी केला. तरी सुध्दा या दलित समाजाच्या वाट्याला कधी सवर्णामुळे तर कधी स्वजातीतील पुढाऱ्यांच्या लोभीपणामुळे पावलोपावली या ना त्या रुपाने कवाडे मिटलेली दिसतात. लेखिकेने आपल्या परीने ही कवाडे उघडण्याचा प्रयत्न केला आहे. अस्पृश्य वर्गाच्या

दु:खात लोटलेल्या, पशुतुल्य वागणुक दिलेल्या जीवनाची कवाडे उघडण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे. लेखिका मुक्ता सर्वगोड यांनी आपल्या समाजकार्याने करण्याचा प्रयत्न केलेला आहे. याच चित्रण 'मिटलेली कवाडे मध्ये' दिसते.

## ७. दलित स्त्री जीवनाची कहाणी -' रात्रं दिन आम्हा'

पोटाची भूक शमविण्यासाठी करावा लागणारा संघर्ष हे दलित जीवनातील अपरिहार्य अशा झगडयाचे रुप आहे. 'शांताबाई दाणी' यांच्या 'रात्रंदिन आम्हा' या आत्मचरित्रात भुकेची तीव्रता चित्रीत झाली आहे. बालपणी प्रतिकूल परिस्थितीत सर्वच स्तरावर होणारी उपेक्षा सहन करताना भुक मिटविण्यासाठी करावी लागणारी यातायातही दिसते. 'गरीबांना भुकही खूप लागते गरीबांच आरोग्यही चांगल असतं, त्यामुळे भुक जबरदस्त असते.'' अशा विधानातून शांताबाईंनी गरीबांच्या पाचवीला पुजलेल्या भुकेचे चित्र अधोरेखीत केले आहे. त्यामुळे दलितांचे दारिद्रय कसे असते हे कळते.शांताबाई दाणी अजन्म अविवाहित राहिल्या आहेत. स्वीकृत कार्य पुर्णत्वास नेण्यासाठी त्यांनी संसारिक पाश नाकारले आहेत. आंबेडकरी विचाराची सामाजिक आणि राजकिय चळवळ पुढे नेण्यास त्यांनी आपले आयुष्य वेचले.वैयक्तीक भावनांना जीवनात थारा न देता सदोदीत लोककल्याणाचा विचार त्यानी केलेला आहे उभे आयुष्य त्यांनी चळवळीसाठी खर्च केले. हा त्याग महत्वाचा आहे. ध्येयवाद आणि समाज कार्यावरील असीमनिष्ठा त्यांच्या जीवनातून प्रगट झाली. त्यामुळे त्यांचे जीवन व्यक्तीगत न राहता खऱ्या अर्थाने सार्वजनिक आणि लोकोपयोगी ठरेल.

अस्पृश्य समाजातील व्यक्ती मग ती स्त्री असो वा पुरुष, विद्यार्थी असो वा शिक्षक, भोवतालच्या समाज त्यांची जात लक्षात घेऊनच त्याच्याशी वर्तन करतो. जात हा विवक्षित घटक लक्षात घेऊनच माणसाचे भारतीय समाजतील स्थान ठरते.

शांताबाईंची सचोटी, गुणवत्ता किंवा व्यवसाय या गोष्टी सोयीस्कर दुर्लक्षिल्या जातात. केवळ अस्पृश्यतेमुळे दलित व्यक्तींवर तथाकथित उच्चवर्णियांकडून होणारे असे मानसिक हल्ले त्या व्यक्तीला जीवनातून उठविण्याचा प्रयत्न करतातच, परंतु त्याच्या कुटुंबावर आणि समाजावर दहशत बसवतात. त्याच चित्रण येथे आढळते. या सगळ्या संघर्षमय जीवनाच चित्रण शांताबाई दाणी यांच्या 'रात्रंदिन आम्हा' मध्ये प्रामुख्याने पहायला मिळते.

## ८. एका भटक्या स्त्री जीवनाची गाथा -' मरणकळा'

गावं तिथं पालं आणिक पाणी तिथं पालं, खाली धरती वर आभाळ, हातावरच आणा, हातारवच खा, असं जीवन जगणाऱ्या भणंग-भटक्या समाजातील एक समाज म्हणजे गोपाळ समाज ज्या समाजात जन्मलेल्या जनाबाई गिऱ्हे यांनी 'मरणकळा' हे आत्मकथन लिहिले आहे. पोटासाठी गावोगाव बिऱ्हाड पाठीवर घेवून भटकणाऱ्या या समाजाचा सगळ्यात मोठा प्रश्न कोणता असेल तर तो भुकेचा रोजच्या भाकरीचाच आहे. पोटापुढे - भुकेपोटी माणसांचे सारे प्रश्न दुय्यम ठरतात. अशा परिस्थितीत शिक्षण घेणे ही गोष्ट जवळजवळ असंभवनीयच. म्हणून अज्ञान, दारिद्रय, अंधश्रध्दा यांचा या समाजात प्रभाव असणे साहजिक आहे. सतत पोट पाठीला लागलेले त्याची भरती करण्यातच आयुष्य संपत असलेले. किंबहुना ज्यांच्या आयुष्यालाच किंमत नाही. अशा समाजात शिक्षणाचा प्रकाश कुठला असायला ?

स्वातंत्र्योत्तर काळात हळूहळू का होईना शिक्षणाची प्रकाश किरणे समाजाच्या तळच्या माणसांपर्यत पोहचू लागण्याची प्रक्रिया निदान सुरु तरी झाली. डॉ.बाबा-साहेब आंबेडकरांच्यामुळे दलितांपर्यंतही किरणे पोहचण्यास मदत झाली. नादारी

शिष्यवृत्ती यामुळे दलितांच्या मुलांना शिक्षणाची दारे खुली झाली म्हणून जनाबाई कचरु गिऱ्हे यांचे पती शिकु शकले. नुसते शिकू शकले असे नाही, तर त्यांनी उच्च शिक्षण घेतले. 'गोपाळ समाज परंपरा आणि इतिहास' या नावाचा संशोधनात्मक लेखन असलेला त्यांचा ग्रंथ प्रकाशित झाला. या पतीच्या ग्रंथ सोहळ्यामुळेच जनाबाईंना आत्मकथन लेखनाची प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी या आत्मकथनाच्या 'मनोगता' मध्ये नमूद केले आहे.

अशा पध्दतीने गोपाळ समाजातील चालीरिती, रुढी, पंरपरा व सुख दुःख यांचा आलेख म्हणजे ' मरणकळा ' हे पुस्तक होय. व्यवस्थेने त्याच्यावर लादलेले भटक भणंग आयुष्य त्यामुळे त्यांच होणारे हाल या सर्वाच चित्रण म्हणजे जनाबाई गिऱ्हे यांच 'मरणकळा' हे आत्मकथन होय.

## ९. भटक्या समाजाचे संघर्षमय जीवन-चित्र-'तिन दगडाची चूल'

भटक्या जमातीच्या व्यथा, वेदना या 'तिन दगडाची चूल' मध्ये दिसतात. पालाबरोबर फिरताना रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, देवधर्म यामध्ये गुंतलेली माणसे आषाढ साजरा करण्यासाठी एकत्र येतात. पालावरच जीणं किती भयानक असतं, ऊन, वारा, पाऊसात ही पालावर राहणारी माणसं कधी पोटाला अन्न असतं. कधी उपाशी दिवस काढतात. कामधंदा मिळत नाही, पोटासाठी गावोगाव फिरत गेल्यावर एकमेकांचा पत्ताही मिळत नाही. गावाबाहेर जिथं कोणी राहत नाही तिथं ही माणसं राहतात. या भटक्या जमातीतील स्त्रियांचे जीवन फार भयंकर. रांधा,वाढा,उष्टी काढा, पुरुषांच्या अधीनच रहा. यापेक्षा त्यांच वेगळ अस जग नाही. हे सर्व बघताबघता लेखिका घडत गेली. पालावरची भांडणे, स्त्रीयांचे होणारे हाल मर्यादेपेक्षा जास्त दुःख सहन करण्याची त्यांच्यात आलेली क्षमता याच वर्णन येत.

विमल भोसलेंचा दादासाहेब मोरेशी झालेला विवाह आणि त्यानंतर बदलत गेलेले जीवन. पालाबरोबर फिरण होत, आता ते नवऱ्याबरोबर फिरण आल. गावकुसाबाहेरच राहण गावात भाड्याच्या खोलीत आल. दादासाहेबाबरोबर चळवळीशी संबंध आल्यावर जीवनाचा, जगण्याचा अर्थ कुठ लागला भटक्या जाती-जमातीच्या वेदना, दु:ख डोळ्यासमोर दिसु लागली. ही सगळी माणसे या लाखो माणसांसाठी काही तरी केल पाहिजे. यांच्या दु:खापुढे स्वत:च दु:ख अगदीच लहान वाटू लागली. परिस्थितीशी संघर्ष करण्याच धाडस त्यांच्यात निर्माण झाले. एक अल्पशिक्षित स्त्रि विकसीत होत गेलेली विमल मोरे हीच हे रुप, याच चित्रण करणार हे आत्मकथन चाकोरीबध्द मराठी साहित्याची सीमा ओलांडून पुढे गेलेले आहे. यामध्ये भटक्याजमाती मधील संघर्षमय जीवनाचे वास्तव चित्रण आले आहे.

अशा पध्दतीने 'तिन दगडाची चुल' मध्ये विमल मोरे यांचे जीवन चित्रित होत असतानाच भटक्या विमुक्त जाती जमातीच दु:ख, दैन्य आणि दारिद्रयाचे चित्रण झालेल आपल्याला दिसुन येत.

## १०. <u>आदिवासी जीवनाचे दु:ख मांडणारे आत्मकथन 'आदोर'-</u>

नजुबाई गावीत ( 'आदोर' व 'तृष्णा' ) यांनी आपल्या 'मावची' जमातीच्या जीवनाचे - कष्टाचे- सतत झगडा द्यावा लागण्याचे अज्ञान -अंधश्रध्दा दारिद्रय यात खितपत पडलेल्या लोकांचे दर्शन घडविलेले दिसते. आधुनिक काळात ही अतिशय पुरातन, आदीम अवस्थेतच जगत असणारा - सुधारणा आणि सुविधा, ज्ञान आणि विचार यापासून शेकडो योजने दूर असलेला हा समाज येथे चित्रीत होतो. जंगलाच्या बाजुला राहणारे हे आदीवासी - दहा - पाच - घरटी - नात्यागोत्याची माणसे मिळून राहतात. पुर्वी जंगलातून मोकळपणाने फिरणारे - जंगलातून अन्न ,वस्त्र, निवारा या

मुलभुत गरजा भागणारे हे लोक, बदलत्या काळात कायदे बदलले, सुधारणा झाल्या, पण त्यांच्यापासुन कित्येक मैल दुर राहिल्या, कायद्यांमुळे जंगलातल्या राखण करण्याच्यामिषाने, शिपावड्यांच्या, मुकादमांच्या पोलिसांच्या भीतीने आणि असुरक्षिततेने, यांचे जीवनच ग्रासुन गेलेले दिसते. सावकार आणि वाणी त्यांचे कष्ट फुकटात घेतात. त्यांची फसवणुक करतात. चौपटीने दाम वसुल करतात यांच्या स्त्रि यांकडे आपल्याच मालकीच्या असल्यासारखे संधी मिळता चटपटलेले उच्च जातीचे, 'साहु' जमातीचे लोक दिसतात. हा आदीवासी दारिद्रय, अज्ञान, अंध:श्रध्दा, कष्ट, गुन्हेगार अनारोग्य यांच्या दलदलित फसतच चाललेला दिसतो. आपले आई-वडील नात्या गोत्याचे लोक यांच्या जीवनक्रमाला समोर ठेवून नजूबाईंनी त्यांच्या जीवनातले इतर समाजापेक्षा वेगळे पडलेले, आदिम आवस्यच भोगणारे उपेक्षितपण आत्मकथनातून मांडलेले दिसते.

एकूणच या आदिवासी स्त्रियांना कष्टाचे चक्र, नीती मूल्यांचे दडपण, पोरवडा, सासुरवासाचा त्रास, नवऱ्याची गुलामी या सगळ्याचे ओझे बाळगतच जीवन कंठावे लागते. याचे चित्रण या आत्मकथनातून दिसते.

## ११.पुरुषी व्यवस्थेला छेद देणार आत्मकथन'मला उध्वस्त व्हायचंय'-

स्त्रीवर परंपरेची, समाजाची, पुरुषांची, व्यवस्थेची कौटुंबिक शारीरिक बंधने किती मजबूत जखडलेली आहेत. यातून निसटताना मुक्त होऊन बाहेर पडताना तिला किती व्यथा-वेदना होतात. याचे दाहक चित्रण मल्लिका अमरशेख यांनी 'मला उध्वस्त व्हायचंय' या आत्मकथनामध्ये केलेले आहे. इतके करुन ही ती फक्त एका पुरुषापासून मुक्त होते. पण ते मुक्त होण तिला स्वतंत्र समर्थ करण्याऐवजी उध्वस्त करण्याकडे घेऊन जाते. हा एक प्रतिनिधिक स्त्री जीवनाचा अविष्कार आहे. एकूणच

पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रीला जे भोगावे लागते. स्त्री म्हणून जे सहन करावे लागते. याचा अतिशय बिनधास्तपणे मल्लिका अमरशेखनी वेध घेतला आहे. यातून स्त्री जीवनासंबंधी कांही मूलभूत प्रश्न समोर येतात. त्यामध्ये पुरुषी व्यवस्थेतील स्त्रियांचे असणारे स्थान तिचे स्वातंत्र्य याबद्दल विचार व्यक्त करताना त्या म्हणतात, ''पण खरोखर बायकांना न्याय कुणी द्यावा, तिची बाजु कळल्याशिवाय तिचे हक्क, तिचे स्वातंत्र्य एका बाजुला न मानता पुरुष तिला कोणत्या निकषावर न्याय देवू शकतो.''(९) पुरुषाला पूर्ण स्वातंत्र्य उपभोगावयास मिळते. पण स्त्रीला मात्र पारतंत्रच इथे पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमुळे स्त्रीच्या मनाची झालेली घुसमट व्यक्त होते.स्त्रीला माणूस म्हणून पाहण्याची वृत्ती पुरुषात नाही. त्यामुळे ती कशी दुर्लक्षीती गेली आहे. याचे दु:ख लेखिका मांडतात. स्त्रियांकडे पाहण्याचा पुरुषांचा भोगवादी दृष्टीकोन त्यामुळे स्त्रीला या समाजव्यवस्थेत स्थानच नाही. त्यामुळे लेखिका पुरुषी व्यवस्थे -विरुध्द बंड पुकारते.

मल्लिका अमरशेख यांनी पाहिलेली तारुण्यातील स्वप्ने,वैवाहिक जीवनातील तिचे अनुभव मातृत्व भावनेचा आविष्कार आणि या सर्व अवस्थेत तिच्या जीवना-वरील पतीचे असलेले पूर्णपणे वर्चस्व. या सर्वस्वामुळे आलेले उध्वस्तीकरण येथे चित्रीत झाले आहे.

## १२. दलित स्त्रियांची आत्मकथने व 'आयदान' -

प्रामुख्याने दलित चळवळीत अग्रेसर असणाऱ्या स्त्री कार्यकर्त्यांनी लिहिलेली दलित स्त्री आत्मकथने दिसुन येतात. त्यात शांताबाई दाणी, मुक्ता सर्वगोड, उर्मिला पवार इ. चा समावेश होतो. आपला समाज अनेक वर्षे ज्या अन्याय अत्याचारात खितपत पडला आहे. त्याच्या कळवळ्यातून त्यांनी आत्मकथने लिहिली आहेत.

त्याचबरोबर आपण जगत असताना व चळवळीचे काम करत असताना आलेले कडू-गोड अनुभव ही लेखिकांनी आपआपल्या आत्मकथनात वर्णन केले आहेत. सर्वसामान्यपणे सर्व दलितांना जो अस्पृश्यतेचा अनुभव लहानपणी व मोठेपणी अनुभवास येतो. त्याचे चित्रण यासर्वच आत्मकथनातून प्रामुख्याने येते. प्रत्येक लेखिका ज्या जातीत जन्मली आहे . त्या जातींच्याकडे इथला समाज तुच्छतापूर्वक पाहतो. याच चित्रण या आत्मकथनांच्यामध्ये प्रामुख्याने दिसून येते. उर्मिला पवार महार जातीच्या आहेत. म्हणून त्यांच्या वर्गातील मुली, गावातील लोक त्यांना अस्पृश्यतेची वागणुक देत याच वर्णन आयदानमध्ये केले आहे. ''अस्पृश्य म्हणून आणि स्त्री म्हणून ही वाट्याला आलेले भोगवटे दुःख भळभळणाऱ्या जखमा, कधी संघर्ष, कधी अगतिकता हा सारा प्रवास व्यक्तीगत पातळीवरुन समष्टीचा होतो. कारण दलित जाणीव ही व्यापक समाजांची आणि संस्कृतिची आयडेन्टिटी' ठरते.'' (१०) हे डॉ. गंगाधर पानतावणे यांचे मत रास्तच वाटते. कारण शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरी करीत असताना शांताबाई दाणींना जसे वाईट अनुभव आले तसेच अनुभव उर्मिला पवार यांना ही आलेले आहे.नोकरीच्या ठिकाणी आरक्षणाच्या कारणावरुन केला जाणारा छळ याचे वर्णन सर्व अस्पृश्यांना भोगायला मिळतो. याच वर्णन लेखिकेच्या अनुभवातून आयदानमध्ये आलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ साली धर्मांतर केले. व दलित समाजात एक नवचैतन्य संचारले अनेक वर्षे गुलामगिरीच्या बेड्या तोडून टाकाव्या तशी दलितांची अवस्था झाली. या प्रसंगाच व त्यामुळे झालेल्या परिवर्तनाच चित्रण त्याच्या चांगल्या वाईट अनुभवासह दलित आत्मकथनांच्यामधून आलेल आपल्याला दिसून येत. या प्रमाणे 'आयदान' मध्येही आलेल आपल्याला दिसून येत. देवळात जाणाऱ्या मैत्रिणी

वास्तुपुस्त करीत तेव्हा लेखिका निर्भयपणे त्यांना सांगते, "अग आम्ही बौध्द आहोत. आम्हाला देवळात जायचं काय काम ?" (११) हा नवा जन्म आयदानमधून प्रामुख्याने येताना आपल्याला दिसून येतो. दलित चळवळीत काम करणाऱ्या पुरुषांना सुध्दा स्त्री ही आपली गुलामच आहे. अस वाटत आलेल आहे. याच वर्णन सर्वच दलित स्त्रियांच्या आत्मकथनात येते. तसे आयदान मध्येही येते. उर्मिला पवारांचे पती हरिश्चंद्र ही लेखिकेच्या शिक्षणाला विरोध करताना दिसतात. याच वर्णन लेखिका आयदान मध्ये करते. " हरिश्चंद्र आपली बायको आता आपल्या पुढे गेली ती आपल्या काह्यात राहिली नाही. याची पहिली जाणीव झाली." (१२) स्त्री ही माणूस असून पुरुषांप्रमाणे त्यांना ही वागण्याचा अधिकार आहे अशा पध्दतीची विचारसरणी लेखिका या आत्मकथनात मांडताना दिसते. "उर्मिला पवारांची मनस्थिती स्त्री संघटनातील ध्येय धोरणातून जोपासली गेली आहे. पुरुषांकडे मसल पॉवर असेल तर स्त्रीकडे जननशक्ती आहे. म्हणून व्यक्तीला मिळणारे सारे अधिकार स्त्रिला मिळालेच पाहिजेत अशी लेखिकेची धारणा आहे." (१३) हे डॉ. गंगाधर पानतावणे यांचे मत मनास पटते. कारण तसे पाहता मराठी साहित्यातील दलित स्त्री आत्मकथनात प्रामुख्याने आपला समाजदलित समाज व त्याच्यावर वर्षानुवर्षे होणारे अन्याय, अत्याचार याचे वर्णन येते. त्याचप्रमाणे इथल्या दलित स्त्रिया त्यांच्यातील अज्ञानामुळे कशा नडल्या जातात याच वर्णन येत. तर आयदानमध्ये या सर्वांबरोबरच इथली पुरुष व्यवस्था सर्व स्त्री जातीलाकशी शोषते. याच वर्णन येत. "आयदान मध्ये दलित स्त्री लेखिका, स्त्री आणि कार्यकर्ती स्त्री असे तीन पदर येतात. या ठिकाणी घटनांच वर्णन आणि काही ठिकाणी

भावनांची टिपण्णी असेच त्यांचे स्वरुप राहते. यातील दलित स्त्री, लेखिका स्त्री आणि कार्यकर्ती स्त्री यांची व्यक्तिमत्वे मात्र बिनधास्तपणाच्या नादात व्यक्तच होत नाहीत. अन्य आत्मकथनांच्या पेक्षा आयदानचा प्रवास एक पाऊल वर चढतो, पण कोरडाच राहतो.'' (१४) हे मत योग्यच वाटते. कारण मराठीतील इतर आत्मचरित्रापेक्षा स्त्री जाणीवेची नेमकी जाण होवून आयदान चे लेखन झाले आहे.

## १३. दलित स्त्रीयांच्या आत्मकथनातील स्त्री जीवन दर्शन -

दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून प्रकट झालेले स्त्री जीवन वेदनेने आणि करुणेने ओथंबलेले आहे. दारिद्रय, भुक, अज्ञान याने वेढलेले आहे. अनेक यातना भोगणारी स्त्री ही दलितांहून दलित आहे. कारण ती उच्चवर्णीय समाजाकडून धिक्कारली गेली आहे. आणि स्व समाजातील पुरुष वर्गाकडून पिळली गेली आहे तिचे शोषण शारीरिक आणि मानसिक स्वरुपाचे आहे. स्त्रीत्वामुळे ती पुरुष प्रधानतेची बळी ठरते, तर दलितत्वामुळे ती जातीव्यवस्थेची शिकार होते. ''जातिव्यवस्था ही भारतीय स्त्रियांचे शोषण करणारी अनन्य संस्था आहे. यामुळेच भारतीय स्त्री शोषणात अधिकच भरपडली आहे.'' (१५) दलित स्त्रीची कुटुंबातील फरफट ही दारिद्रयामुळे होते. हे दारिद्रय अस्पृश्यतेने बहाल केले आहे. उच्चवर्णीय समाजात अस्पृश्य पुरुषांकडे प्राधान्याने अस्पृश्य म्हणूनच पाहिले जाते. मात्र दलित कुटंबात तो प्राधान्याने पुरुष प्रधानतेचा प्रतीक म्हणून स्विकारला जातो. या सर्वामुळे तिच्या होणाऱ्या खच्चीकरणाचे चित्रण दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून प्रकट झाले आहे.

हातावर पोट भरणाऱ्या आणि डोक्यावर उभा संसार वाहणाऱ्या दलित स्त्रिया

या कष्टाच्या मूर्तिमंत प्रतीक ठरतात. सर्वच बाजूने कोंडी झाल्यामुळे हवालदिल झालेले स्त्रीमन चिकाटीने परिस्थितीशी झुंजत राहते. दलित स्त्रियांच्या श्रमाची प्रतिष्ठा आणि अवहेलना जातिव्यवस्थेमुळे त्यांच्या पदरात बांधली गेली. निमुटपणे अन्याय सहन करणाऱ्या या स्त्रियाच केवळ दोषी नसून, वर्णव्यवस्था त्याला कारणीभूत आहे. '' व्यक्ती, कुटुंबे, गावे अनेक गावांचा गुंतवला त्याप्रमाणे अनेक समाजस्तरांचा गुंतवळा या लेखनातुन आकार होतो. प्रांजळपणा, सरलत्व, भेदकता व विद्रोह ही या लेखनाची वैशिष्ट्ये होत.''[१६] जीवनातील निष्कलंक चारित्र्य, शीलरक्षण आणि आत्मसन्मान या गुणांमुळे दलित स्त्रिया केवळ भुकेसाठी प्रवाह पतित झालेल्या नाहीत. आपल्या 'स्त्रीत्वा' चा सौदा करुन पोट भरण्यापेक्षा त्या उपासी पोटी निजलेल्या आहेत. हे लक्षणीय गुण आत्मकथनात दिसतात.

दलित स्त्रियांच्या आत्मकथनात प्रामुख्याने दलित जातीत जन्मलेल्या माणसांच्या दु:खाचे चित्रण दिसते. तर दलित पुरुष दलित स्त्रीचे कसे शोषण करतो त्यामुळे तीच्या जीवाचे होणारे हाल त्यामुळे तीचे वर्षानुवर्षे होत आलेले मानसिक शारीरिक, सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय शोषण दलित स्त्री आत्मकथनांमध्ये दिसते.त्यामुळे ती अतिशय कडू गोड अनुभवानी भरलेली दिसतात.या सर्वांचे चित्रण करणे व त्याविषयी समाजामध्ये जागृती करुन अखंड स्त्रीजातीचे जे शोषण चालले आहे त्याविरुध्द लोक जागृतीचे काम या आत्मकथनातील सर्वच लेखिका करताना दिसतात. आंबेडकर विचाराने भारावलेल्या या स्त्रीया प्रामुख्याने अनेक वर्षाच्या गुलामगिरीविरुध्द बंड करताना दिसतात. उर्मिला पवार आयदान मध्ये प्रामुख्याने स्त्रीयांचे होणारे शोषण व पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुध्द विद्रोह करताना दिसतात. आयदानमध्ये एकूणच सर्व स्त्रीयांच्या व्यथा,वेदना, शोषण,श्रध्दा-अंधश्रध्दा, समज-गैरसमज,भोळ्या समजुती त्यामुळे त्यांचे होणारे नुकसान यांचे अतिशय नेमकेपणाने व परिणाम कारक चित्रण केलेल आपल्याला दिसून येते.

## १४. निष्कर्ष

१) अनिती आणि वर्चस्वखोर उद्दाम संस्कृतीने स्त्रिला अप्रतिष्ठित राखले यांचा शिलालेख म्हणजे दलित स्त्री आत्मकथने.

२) दलित स्त्री आत्मकथने ही दलित स्त्री जीवनाचे पदर उलघडण्याचे काम करतात. व्यक्तीत्वाचे विविध रंग न्यालेली ही आत्मकथने म्हणजे मराठी स्त्रीचा सांस्कृतिक इतिहासच होय.

३) या आत्मकथनाच्या मधून सतत राबणारी, आपल्या कुटुंबासाठी कष्ट उपसणारी आपल्या संसाराची चिंता करणारी शोषिक मनाची नवऱ्यापेक्षा अधिक श्रम करणारी स्त्री चित्रीत होते.

४) आंबेडकरी चळवळ, त्यांच्या प्रेरणेने झालेले धर्मांतर, शिक्षणामुळे बदललेली पिढी यांचे नुसते दर्शन घडते असे नव्हे, तर या दोन पिढ्यांमध्ये पडलेले आर्थिक, सामाजिक, मानसिक अंतर लेखिका शांताबाई कांबळे 'माज्या जल्माची चित्तरकथा' मध्ये दाखवू इच्छितात.

५) 'अंत:स्फोट' या पुस्तकांच्या चिंतनशील भूमिकेतून लेखिकेच्या समाजविषयक व जीवन विषयक दृष्टिकोन जाणवतो.

६) डॉ. आंबेडकरांच्या उदयानंतर झालेली परिवर्तने त्यांचा परिणाम आंबेडकरांच्या पश्चातचा समाज यांचे चित्र बेबी कांबळे यांच्या 'जीणं आमुच' मध्ये उमटलेले दिसते.

७) गोपाळ समाजातील चाली-रिती रुढी-परंपरा व सुख दु:ख याचा आलेख 'मरणकळा' मध्ये येतो.

८) भटक्या समाजाच्या संघर्षमय जीवनाचे चित्रण विमल मोरे यांच्या 'तिन दगडाची चुल' मध्ये येते.

९) 'आदोर' मध्ये नजूबाई गावीत यांनी सर्व सोयी सुविधांन पासून आदिम जीवन जगणाऱ्या माणसाच्या जिवनाचं चित्रण केले आहे.

१०) या सर्व आत्मकथनांच्या जवळच नात सांगणार 'आयदान' हे आत्मकथन आहे.

११) पारंपरिक पुरुष सत्ताक व्यवस्थेला विरोध करण्याच काम 'मला उद्धवस्त व्हायचंय' मध्ये केले आहे.

१२) 'आयदान' मध्ये दलित स्त्री लेखिका, एक स्त्री आणि एक कार्यकर्ती स्त्री असे तीन पदर येतात.

१३) दलित स्त्रियांच्या श्रमाची अप्रतिष्ठा आणि अवहेलना जातीव्यवस्थेमुळे त्यांच्या पदरात बांधली गेली. निमुटपणे अन्याय सहन करणाऱ्या स्त्रियांच्या दयनीय अवस्थेचे चित्रण 'आयदान' मध्ये येते.

## ● संदर्भ ग्रंथ सूची


१) संपा. प्रा. नल्गे, डॉ. पानतावणे - स्त्री आत्मकथन (प्रस्तावना), (१९९२)
पृष्ठ क्रं. ७ सुरेश एजन्सी, पुणे.

२) तत्रैव, पृष्ठ क्रं. ९

३) डॉ. मनोहर जाधव, दलित स्त्रियांची आत्मकथने स्वरुप आणि चिकित्सा, सुविधा प्रकाशन, पुणे. (१९९८)पृष्ठ क्रं. ३५

४) तत्रैव, पृष्ठ क्रं. ४७

५) शांताबाई कृष्णाजी कांबळे - 'माज्या जल्माची चित्तरकथा' पुर्वा प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती . (१९८६). पृष्ठ क्रं. २९.

६) डॉ. वासुदेव मुलाटे - दलित आत्मकथने : संकल्पना व स्वरुप (१९९९)
पृष्ठ क्रं. ३५

७) बेबी कांबळे - जिणं आमुचं (प्रस्तावना) मानसन्मान प्रकाशन - पुणे प्रथम आवृत्ती (१९८४) पृष्ठ क्रं. ७

८) आरती कुसरे-कुलकर्णी - 'दलित स्वकथने', विजय प्रकाशन, नागपूर . (१९८८) पृष्ठ क्रं. ७६

९) मल्लिका अमरशेख - मला उध्वस्त व्हायचय मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती (१९८४) पुणे पृष्ठ क्रं. ११९

१०) डॉ. गंगाधर पानतावणे - मानाचे पान 'ललित' जुलै (२००४) (जा.फे.मा.)

११) उर्मिला पवार - आयदान (२००३) ग्रंथाली प्रकाशन, मुंबई पृष्ठ क्रं. १७

१२) तत्रैव पृष्ठ कृ. (७३)

१३) डॉ. गंगाधर पानतावणे - मानाचे पान 'ललित' जुलै (२००४)

१४) दिप्ती राऊत - 'नव्वदोत्तर स्त्री आत्मकथने नवऱ्यापासून नवऱ्यापर्यंत' (दर्शन - दिवाळी अंक २००४) पृष्ठ कृ. ६१

१५) प्रा. प्रतिमा परदेशी - डॉ. आंबेडकर आणि स्त्री मुक्ती सावित्रीबाई फुले प्रकाशन, चिंचवड पुणे. ( १९९७ ) पृष्ठ क्रं. १३३

१६) डॉ. यशवंत मनोहर - आंबेडकरवादी मराठी साहित्य, भीमरत्न प्रकाशन, नागपुर. प्रथम आवृत्ती (१९९९) पृष्ठ क्रं. १४५